**वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचे पृष्ठ**

**महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३**

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम २०१२ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि सेवाप्रवेश नियमात केलेल्या दिनांक २३.०६.२०२२ रोजीच्या सुधारीत तरतुदींनुसार समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ६, धुळे यांचे आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे **दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत** स्विकारण्यात येतील. हया बद्दलची सविस्तर माहिती policerecruitment२०२४.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास सशस्त्र पोलीस दलातील समादेशक यांच्या आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment२०२४.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरीता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम १०० गुणांची शारीरिक चाचणी परिक्षा घेण्यात येईल व त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही राज्य राखीव पोलीस बलातील सर्व गटांमध्ये **एकाच दिवशी आयोजीत करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारीरिक चाचणी घेण्यात येणार आहे. शारीरिक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारांमधून संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्केपेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.**
- **शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमूद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधुन एक गुणवत्तायादी तयार केली जाईल.** तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection ) असेल. **शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दिनांक १०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.**
- सशस्त्र पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारीरिक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे, सामाजीक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना policerecruitment२०२४.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहु जाहिरात उमेदवारांनी काळजीपुर्वक वाचुन, समजुन घ्यावी. तसेच, सामाजीक, समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांवावतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**
- **भरती प्रक्रिये दरम्यान शारीरिक चाचणी व लेखी चाचणी मध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतुन वाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.**
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या संबंधीत घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात आवेदन अर्ज करु शकणार नाहीत.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचीका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचीका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचीकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

(प्रल्हाद नि. खोडे)
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे.

## संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात

**महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३**
**राज्य राखीव पोलीस बल गट क्र.६, धुळे**

**जाहिरात क्रमांक - समा./गट-६/आशा-१/पो.भ. २०२२-२०२३/ 1475 /२०२४, धुळे.** दिनांक 29 FEB 2024

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश) नियम २०१२ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २३-०६-२०२२ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणांनुसार समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ६, धुळे यांच्या आस्थापनेवर सन २०२२-२०२३ मध्ये सशस्त्र पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी १७३ पदे भरण्यासाठी सशस्त्र पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

**१) सशस्त्र पोलीस शिपाई**

| | अ.जा. | अ.ज. | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्युएस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकुण** | १७ | ४८ | ९ | ९ | ८ | ८ | ८ | २३ | १७ | १७ | ९ | १७३ |
| **कप्पीकृत आरक्षण** | | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | ९ | ३१ | ८ | ८ | ७ | ७ | ७ | १५ | ९ | ९ | ८ | ११८ |
| **खेळाडु** | १ | २ | - | - | - | - | - | १ | १ | १ | - | ६ |
| **प्रकल्पग्रस्त** | १ | २ | - | - | - | - | - | १ | १ | १ | - | ६ |
| **भुकंपग्रस्त** | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| **माजी सैनिक** | ३ | ७ | १ | १ | १ | १ | १ | ३ | ३ | ३ | १ | २५ |
| **अंशकालीन पदवीधर** | १ | २ | - | - | - | - | - | १ | १ | १ | - | ६ |
| **पोलीस पाल्य** | १ | १ | - | - | - | - | - | १ | १ | १ | - | ५ |
| **गृहरक्षक दल** | १ | २ | - | - | - | - | - | १ | १ | १ | - | ६ |
| **अनाथ** | | महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन शा.नि. क्र.अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का.-०३, दिनांक ०६-०४-२०२३ अन्वये सशस्त्र पोलीस शिपाई भरती - २०२१ मधील अनाथ आरक्षणाचा ०१ पदाचा अनुषेश व सशस्त्र पोलीस शिपाई भरती - २०२२-२०२३ मध्ये अनाथ यांच्या करिता भरतीच्या एकूण पदाचे १% प्रमाणे २ पदे असे एकुण ०३ पदे अनाथ यांच्या करीता आरक्षित ठेवण्यात येतील. | | | | | | | | | | |

**महत्वाची टिप :-**

राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲन्टी करप्शन ब्युरो यांना संपर्क साधुन तक्रार करावी. तसेच या संदर्भात उमेदवार समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ६, धुळे या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष सशस्त्र पोलीस शिपाई भरती समिती २०२२-२०२३ तथा समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.६, धुळे दुरध्वनी क्रमांक ०२५६२- २७९४३४ यांच्याशी संपर्क साधुन तक्रार करु शकतील.

उमेदवारांना काही अडचणी आल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबर वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नांव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे (कार्यालयीन वेळेत) | ०२५६२ - २७९४३४ |

(प्रल्हाद नि. खाडे)
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे.